कानाचा संसर्ग (otitis media)

अक्यूट ओटायटिस मिडिया (Acute otitis media) हा एक कानाचा वेदनादायक संसर्ग आहे. ह्याच्यात कानाच्या मधल्या भागाला सूज आणि संसर्ग होतो.

क्रॉनिक ओटायटिस मिडिया (Chronic otitis media) जेव्हा हा त्रास कायम स्वरूपी होतो, ,वारंवार कानातुन पू येणे. ह्यात दोन प्रकर असतात – १. कानाच्या पडद्याला फक्त छिद्र असणे (safe type) सुरक्षित प्रकार 2. कानाच्या हाडाची झीज होणे , असुरक्षित प्रकार (unsafe type)

लक्षणे

- कानातून द्रव येणे
- डोके दुखणे मान दुखणे
- कान भरल्यासारखं वाटणे
- ताप. उलटी, जुलाब
- तोल जाणे
- ऐकू न येणे

लहान मुले व नवजात बालकांमध्ये ह्यांपैकी काही लक्षणे दिसतात

- सतत रडणे
- चिडचिड करणे
- झोप ना येणे
- कान ओढणे, कान दुखणे

युस्टेशियन ट्यूब ही नळी कानाच्या मधल्या भागातून घशाच्या मागच्या भागा पर्यंत जाते. जेव्हा ह्या नळीला आतून सूज येते किव्वा ती बंद होते तेव्हा कानाच्या मधल्या भागात द्रव अडकून राहतो, आणि त्याने acute

otitis media (कानाचा संसर्ग) होतो. लहान मुलांमध्ये ही नळी छोटी असते आणि जास्त सरळ असते, जेणेकरून ही लगेच इफेक्ट होऊ शकते.

ही नळी बंद होण्याची कारणे अनेक आहेत:

• ॲलर्जी (वावडे)

• सर्दी

• फ्लू

- सायनस चा संसर्ग
- संसर्गित किंवा मोठे अडेनोईड (नाकाच्या मागचे टॉन्सिल)
- सिगारेट चा धूर
- आडवे झोपवून बाळाला पाजणे

रोगाचे निदान

**ओटोस्कोप (कानाची दुर्बीण)**

कान नाक घसा तज्ञ ह्या दुर्बिणीने कान तपासतात. संसर्गाची काही चिन्हे खालील पैकी:

- पडद्यावरील लालसरपणा,सूज
- रक्त स्त्राव, पू
- कानातील द्रव किव्वा पस
- कानाच्या पडद्याला छिद्र

**ऐकण्याचा तपास**

रोग्याची ऐकण्याची क्षमता ह्याच्याने मोजली जाते

क्ष-किरण /CT scan- असुरक्षित प्रकार (unsafe type)मध्ये

**उपचार**

**औषधे -कानाचे ड्रॉप्स, अँटिबायोटिक्स, वेदना कमी करण्याची औषधे**

***पुढचे उपाय : जर हा संसर्ग वारंवार होत असेल तर***

1. ***अडेनॉइड काधने***

अडेनोइड कर वाढले असून त्याच्याने वारंवार कानाचा संसर्ग होणे

2. मायरिंगोटॉमी: कानाच्या पडद्याला लहान छिद्र पाडून कानामागचा द्रव काढणे

3. Tympanoplasty कानाच्या पडद्याला छिद्र असेल तर नवीन पडदा लावण्याची शस्त्रक्रिया

Mastoidectomy- असुरक्षित प्रकार (unsafe type) मध्ये

Dr. Anagha Joshi

Professor, LTMG Hospital & LTM Medical College

Consultant, HN Reliance Hospital

09820298027